# शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे -१

दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२५६९६ फॅक्स क्रमांक ०२०२६१२२२१७

ई-मेल आय.डी.क्रं dydpune@gmail.com वेब साईट क्रमांक www.dydepune.com


जा.क्र./शिउसं/कार्यशाळा/पुवि/२०१७/6234

दिनांक :- 6/9/2017.

प्रति,

प्राचार्य/प्राचार्या,

पुणे व पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रातील

कनिष्ठ महाविद्यालय/ उच्च माध्यमिक/वरिष्ठ महाविद्यालय संलग्न कनिष्ठ महाविद्यालय, पुणे

**विषयः-** नवीन प्रश्नप्रत्रिका नमुना कार्यशाळेसाठी कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांन्नी उपस्थित राहणेबाबत....

**संदर्भः-** १) प्राचार्य, आबासाहेब गरवारे कॉलेज, कर्वे रोड पुणे-०४.दि.०१.०९.२०१७

२) प्राचार्य, आबेदा इनामदार कनिष्ठ महाविद्यालय, आझम कॅम्पस, कॅम्प पुणे-१ यांचे पत्र दिनांक ०६.०९.२०१७

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे व इंडियन असोसिएशन ऑफ फिजीक्स टिचर्स (IAPT), आबेदा इनामदार कनिष्ठ महाविद्यालय व आबासाहेब गरवारे कनिष्ठ महाविद्यालय, पुणे यांच्या वतीने इ.११वी व इ. १२ वी साठी नवीन प्रश्नपत्रिका नमुना कार्यशाळा आयोजित करण्याचे ठरविलेले आहे.

सदरची कार्यशाळा फक्त पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयासाठी असणार आहे, तरी सदर कार्यशाळेसाठी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील संबधित विषयाच्या विषय शिक्षकास खालील नमुद केलेल्या ठिकाणी व दिनांकादिवशी उपस्थित राहणेबाबत आपल्या स्तरावरुन योग्य ती कार्यवाही करावी. सदर कार्यशाळेस उपस्थित राहिलेबाबत उपस्थिती पत्रक कार्यशाळेच्या ठिकाणी देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | कार्यशाळेचे ठिकाण | दिनांक | वेळ | विषय |
|---|---|---|---|---|
| १ | आबेदा इनामदार कनिष्ठ महाविद्यालय, आझम कॅम्पस, कॅम्प पुणे-१ | ०८.०९.२०१७ | स.१०.३० ते दु.१.३० वाजेपर्यंत | जीवशास्त्र व गणित |
| २ | आबासाहेब गरवारे कॉलेज, ॲसेम्बली हॉल, कर्वे रोड पुणे-०४. | ०९.०९.२०१७ | दु. १.०० ते ४.०० वाजेपर्यंत | भौतिकशास्त्र व रसायनशास्त्र |

MRaut 6.9.17

(मिनाक्षी राऊत)

सहा.शिक्षण संचालक

पुणे विभाग पुणे-१

प्रत माहितीसाठी व योग्य त्याकार्यवाहीसाठी

१) प्राचार्य, आबेदा इनामदार कनिष्ठ महाविद्यालय, आझम कॅम्पस, कॅम्प पुणे-१

२) प्राचार्य, आबासाहेब गरवारे कॉलेज, कर्वे रोड पुणे-०४.

(यांना कळविण्यात येते की, कार्यशाळेच्या ठिकाणी कार्यशाळेस येणा-या शिक्षकांच्या बैठकीची व्यवस्था करण्यात यावी.)

SDG letter